

# ७३ दबाव गट

## अर्थ आणि तंत्र

दबाव गट ही संज्ञा अमेरिकेत उदयाला आली. समान हितांना चालना देण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी सक्रियपणे संघटित झालेला लोकांचा गट म्हणजे दबाव गट. सरकारवर दबाव आणून सार्वजनिक धोरणात बदल घडविण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्यांना दबाव गट म्हटले जाते. हा गट सरकार आणि त्याचे सदस्य यांच्यामधील दुवा असतो.

दबाव गटांना हितसंबंधी गट असेही म्हटले जाते. ते निवडणूक लढवित नाहीत व ते राजकीय सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे ते राजकीय पक्षांपेक्षा निराळे आहेत. ते विशिष्ट कार्यक्रमांशी किंवा मुद्द्यांशी संबंधित असतात आणि त्यांचे कार्य सरकारवर प्रभाव पाडून त्यांच्या सदस्यांच्या हितांचे संरक्षण करणे व त्यांना चालना देणे इतकेच मर्यादित असते.

आपले मत वारंवार मांडणे व पटवून देणे, पत्रव्यवहार, प्रसिद्धी, प्रचार, अर्ज, विनंत्या, सार्वजनिक चर्चा, विधायकांबरोबर संपर्क ठेवणे यांसारख्या न्याय्य व कायदेशीर मार्गांनी दबाव गट सरकारच्या धोरण ठरविण्यावर आणि धोरणाची अंमलबजावणी करण्यावर प्रभाव टाकतात. परंतु काही वेळा ते संप, हिंसक कृती आणि भ्रष्टाचार अशा बेकायदेशीर व अन्याय्य पद्धतींचाही वापर करतात आणि त्यायोगे सार्वजनिक हित आणि प्रशासनाचे चांगले उद्देश धोक्यात आणतात.

दबाव गट तीन वेगवेगळ्या पद्धतींनी/तंत्रांनी आपले उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न करतात, असे ओडेगार्ड याने म्हटले आहे. पहिले म्हणजे, त्यांच्या हिताला पोषक असतील, अशा व्यक्तींना ते सार्वजनिक पदावर आणण्याचा प्रयत्न करतात. दुसरे म्हणजे, सुरुवातीला त्यांच्या बाजूचे असोत किंवा नसोत त्यांच्या मते त्यांच्या हिताला सर्वांत फायदेशीर ठरतील अशी धोरणे स्वीकारण्यास आणि लागू करण्यास ते सार्वजनिक अधिकाऱ्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करतात. या तंत्रास लॉबिंग असे म्हणता येईल. तिसरे म्हणजे, ते जनमतावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात आणि त्यायोगे सरकारवर अप्रत्यक्ष प्रभाव टाकतात; कारण, सरकार लोकशाही पद्धतीने निवडून येत असल्याने त्याच्यावर जनमताचा परिणाम होतो किंवा प्रभाव पडतो. याला प्रचारतंत्र (Propagandizing) म्हणता येईल.[१]

## भारतातील दबाव गट

भारतात अनेक दबाव गट कार्यरत आहेत. पण अमेरिका किंवा ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी इत्यादी पाश्चिमात्य देशांतील गटांसारखे हे गट विकसित झालेले नाहीत. भारतातील दबाव गटांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल—

**उद्योग गट**

उद्योग गटात अनेक औद्योगिक आणि व्यापारी संस्थांचा समावेश होतो. हे भारतातील सर्वांत आधुनिक, सर्वांत प्रबल आणि सर्वांत मोठे दबाव गट आहेत. त्यामध्ये खालील संस्थांचा समावेश होतो—

(१) फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (एफआयसीसीआय-फिक्की) : इंडियन मर्चंट्स चेंबर ऑफ बॉम्बे, इंडियन मर्चंट्स चेंबर ऑफ कोलकाता आणि चेन्नईचे साऊथ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स हे याचे मुख्य घटक आहेत. प्रमुख औद्योगिक व व्यापारी हितांचे हे प्रतिनिधित्व करते.

(२) असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडिया (अॅसोचॅम) : बेंगाल चेंबर ऑफ कॉमर्स ऑफ कोलकाता आणि सेंट्रल कमर्शियल ऑर्गनायझेशन ऑफ दिल्ली हे याचे मुख्य घटक आहेत. अॅसोचॅम हे परकीय ब्रिटिश भांडवलाचे प्रतिनिधित्व करते.

(३) फेडरेशन ऑफ ऑल इंडिया फूड ग्रेन डीलर्स असोसिएशन (एफएआयएफडीए) : धान्य विक्रेत्यांची ही एकमेव प्रतिनिधी संस्था आहे.

(४) ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन (एआयएमओ) : ही संस्था मध्यम आकाराच्या उद्योगांचे मुद्दे हाताळते.

**कामगार संघटना**

कामगार संघटना औद्योगिक कामगारांच्या मागण्या मांडते. यांना श्रमिक संघटना असेही म्हटले जाते. भारतातील कामगार संघटनांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या विविध राजकीय पक्षांशी संबंधित आहेत. त्यामध्ये खालील संघटनांचा समावेश होतो—

(१) ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (एआयटीयूसी) : आयटक असे संबोधले जाते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न.

(२) इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (आयएनटीयूसी) : इंटक असे संबोधले जाते. काँग्रेस (आय) पक्षाशी संलग्न.

(३) हिंद मजदूर सभा (एचएमएस) : समाजवादी पक्षांशी संलग्न.

(४) सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीआयटीयू) : सीटू म्हणून ओळखले जाते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न.

(५) भारतीय मजदूर संघ (बीएमएस) : भारतीय जनता पक्षाशी संलग्न.

(६) ऑल इंडिया सेंट्रल कौन्सिल ऑफ ट्रेड युनियन्स (मार्क्सवादी-लेनिनवादी कम्युनिस्ट पक्ष).

(७) ऑल इंडिया युनायटेड ट्रेड युनियन सेंटर [सोशालिस्ट युनिटी सेंटर ऑफ इंडिया (कम्युनिस्ट)].

(८) न्यू ट्रेड युनियन इनिशिएटिव्ह (राजकीय पक्षापासून स्वतंत्र पण डाव्या विचारसरणीचा).

(९) लेबर प्रोग्रेसिव्ह फेडरेशन (द्रविड मुन्नेत्र कळघम्).

(१०) ट्रेड युनियन कोऑर्डिनेशन कमिटी (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक).

(११) युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेस (रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पक्ष).

(१२) ऑल इंडिया सेंटर ऑफ ट्रेड युनियन्स (भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (संयुक्त).

(१३) अण्णा तोझहिल संघ पेरावई (ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कझागम).

(१४) भारतीय कामगार सेना (शिवसेना).

(१५) हिंद मजदूर किसान पंचायत (जनता दल-युनायटेड).

(१६) इंडियन फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन्स (भारतीय कम्युनिस्ट पक्ष-मार्क्सवादी-लेनिनवादी) न्यू डेमॉक्रसी.

(१७) इंडियन नॅशनल तृणमूल ट्रेड युनियन काँग्रेस (ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस).

(१८) पट्टाली ट्रेड युनियन (पट्टाली मक्कल कच्ची).

(१९) स्वतंत्र तोझहिलाली युनियन (इंडियन युनियन मुस्लीम लीग).

(२०) तेलुगू नाडू ट्रेड युनियन कौन्सिल (तेलुगू देशम पक्ष).

भारतातील पहिली कामगार संघटना : ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (एआयटीयूसी : आयटक) स्थापना सन १९२० मध्ये झाली. लाला लजपतराय हे या कामगार संघटनेचे पहिले अध्यक्ष होते. इ. स. १९४५ पर्यंत काँग्रेस, समाजवादी आणि कम्युनिस्ट यांनी आयटकमध्ये एकत्र काम केले. आयटक ही भारतातील कामगारांची केंद्रीय कामगार संघटना होती. पुढील काळात कामगार संघटना राजकीय पक्षानुसार विभागल्या गेल्या.

**कृषी गट**

कृषी गट शेतकरी आणि शेतमजूर वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामध्ये खालील संघटनांचा समावेश होतो-

(१) भारतीय किसान संघटना (उत्तर भारतातील गव्हाच्या पट्ट्यातील महेंद्रसिंग टिकैत प्रणीत संघटना)

(२) अखिल भारतीय किसान सभा (सर्वांत जुना व सर्वांत मोठा कृषी गट)

(३) रिव्होल्युशनरी पीझंटस कन्व्हेंशन (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १९६७ मध्ये संघटित केलेला. यातून नक्षलवादी चळवळीचा उदय झाला.)

(४) भारतीय किसान संघ (गुजरात)

(५) आर. व्ही. संघम (तमिळनाडूमध्ये. सी. एन. नायडू यांच्या नेतृत्वाखाली)

(६) शेतकरी संघटना (महाराष्ट्रामध्ये शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली)

(७) हिंद किसान पंचायत (समाजवाद्यांच्या नियंत्रणाखाली)

(८) अखिल भारतीय किसान संमेलन (राज नारायण यांच्या नेतृत्वाखाली)

(९) युनायटेड किसान सभा (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणाखाली)

**व्यावसायिक संघटना**

या संघटना डॉक्टर, वकील, पत्रकार आणि अध्यापक यांचे मुद्दे व मागण्या मांडतात. अनेक बंधने असली तरी या संघटना त्यांच्या कामाच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी निदर्शने करण्यासारख्या विविध मार्गांनी सरकारवर दबाव आणतात. यामध्ये खालील संघटनांचा समावेश होतो-

(१) इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) भारतीय वैद्यकीय संघटना

(२) बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय)

(३) इंडियन फेडरेशन ऑफ वर्किंग जर्नालिस्टस् (आयएफडब्ल्यूजे) भारतीय श्रमिक पत्रकार महासंघटना

(४) ऑल इंडिया फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स (एआयएफयूसीटी) अखिल भारतीय विद्यापीठ व महाविद्यालय अध्यापक महासंघ

### विद्यार्थी संघटना

विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत; परंतु, कामगार संघटनांप्रमाणे या संघटनासुद्धा विविध राजकीय पक्षांशी संबंधित आहेत. यामध्ये खालील संघटनांचा समावेश होतो.

(१) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद : एबीव्हीपी (भाजपशी संलग्न)

(२) ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशन : एआयएसएफ (भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न)

(३) नॅशनल स्टुडंटस् युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटना कॉंग्रेस (आय)शी संलग्न

(४) प्रोग्रेसिव्ह स्टुडंटस् युनियन (पीएसयू) (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न)

### धार्मिक संघटना

भारतीय राजकारणामध्ये धर्मांवर आधारित संघटनांची महत्त्वाची भूमिका आहे. ते संकुचित समुदाय हिताचे प्रतिनिधित्व करतात. त्यामध्ये खालील संघटनांचा समावेश होतो.

(१) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस)

(२) विश्व हिंदू परिषद (व्हीएचपी)

(३) जमात-ए-इस्लामी

(४) इत्तेहाद्-उल्-मुसलमीन

(५) अँग्लो इंडियन असोसिएशन

(६) असोसिएशन ऑफ द रोमन कॅथॉलिक्स

(७) ऑल इंडिया कॉन्फरन्स ऑफ इंडियन ख्रिश्चन्स

(८) पारशी केंद्रीय संघटना

(९) **शिरोमणी अकाली दल :** शिरोमणी अकाली दलास आपण राजकीय पक्ष म्हणण्यापेक्षा दबाव गट म्हणणे अधिक उचित ठरेल; कारण, शिरोमणी अकाली दलाचा संघर्ष शिखांच्या वेगळ्या राज्यासाठी नाही तर त्यांनी चालवलेले आंदोलन हे शीख समाज प्रचंड संख्येच्या हिंदू समाजात शोषला जाऊ नये, यासाठी आहे. वेगळ्या भाषेत सांगावयाचे झाले तर शिरोमणी अकाली दलाचे आंदोलन हे शिखांचे धार्मिक वेगळेपणा जपण्यासाठी आहे, असे म्हणावे लागेल.[२]

### जातींच्या संघटना

धर्माप्रमाणे भारतीय राजकारणात जात हा महत्त्वाचा घटक आहे. भारतीय संघराज्यातील अनेक राज्यांतील स्पर्धात्मक राजकारण म्हणजे वस्तुत: जातीय स्पर्धेचे राजकारण आहे. तमिळनाडू आणि महाराष्ट्रामध्ये ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर, राजस्थानमध्ये राजपूत विरुद्ध जाट, आंध्रमध्ये कम्मा विरुद्ध रेड्डी, हरियानामध्ये अहिर विरुद्ध जाट, गुजरातमध्ये बनिया ब्राह्मण विरुद्ध पाटीदार, बिहारमध्ये कायस्थ विरुद्ध राजपूत, केरळमध्ये नायर विरुद्ध एझावा, कर्नाटकमध्ये[३] लिंगायत विरुद्ध ओक्कलिगा. जातीआधारित काही संघटना खालीलप्रमाणे–

(१) तमिळनाडूमध्ये नाडर जाती संघटना

(२) मारवाडी संघटना

---

(२) जे. सी. जोहरी : इंडियन गव्हर्नमेंट अँड पॉलिटिक्स, विशाल पब्लिकेशन्स, आवृत्ती-१३, पृष्ठ ५९१.

(३) पॉल कोलेंडा : कास्ट इन इंडिया सिन्स इंडिपेंडन्स (सोशल अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन इंडिया मध्ये) बासू व सिसियन, पृष्ठ ११०.

(३) हरिजन सेवक संघ

(४) गुजरातमध्ये क्षत्रिय महासभा

(५) वन्नीयाकूल क्षत्रिय संघम

(६) कायस्थ सभा

**आदिवासी संघटना**

मध्य प्रदेश, छत्तीसगढ, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि आसाम, मणिपूर, नागालँड यांसारख्या ईशान्येकडील राज्यांमध्ये आदिवासी संघटना सक्रिय आहेत. सुधारणा घडवून आणण्यापासून ते भारतातून वेगळे होण्यापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या त्यांच्या मागण्या आहेत आणि त्यातील काही विद्रोही कृत्यातही सहभागी असतात. आदिवासी संघटनांत खालील संघटनांचा समावेश होतो—

(१) नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (एनएससीएन)

(२) त्रिपुरामध्ये ट्रायबल नॅशनल व्हॉलेंटिअर्स (आदिवासी राष्ट्रीय स्वयंसेवक)

(३) मणिपूरमध्ये पीपल्स लिबरेशन आर्मी

(४) ऑल इंडिया झारखंड

(५) ट्रायबल संघ ऑफ आसाम

(६) युनायटेड मिझो फेडरल ऑर्गनायझेशन

**भाषिक गट**

भारतीय राजकारणात भाषेचे इतके महत्त्व आहे की, भाषा हा राज्यांच्या पुनर्रचनेचा मुख्य निकष बनला. राजकीय पक्ष तसेच दबाव गट यांच्या उदयाला जात, धर्म आणि जमातीप्रमाणे भाषा हेही कारण आहे. काही भाषिक गट खालीलप्रमाणे—

(१) तमिल संघ

(२) अंजुमन तरक्की–ई–उर्दू

(३) आंध्र महासभा

(४) हिंदी साहित्य संमेलन

(५) नागरी प्रचारिणी सभा

(६) दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा

**विशिष्ट मुद्द्यांवर आधारित गट**

अलीकडच्या काळात एखाद्या विशिष्ट मुद्द्यासाठी, हेतूसाठी, तत्त्वासाठी किंवा कार्यक्रमासाठी दबाव गट स्थापन केले जातात. यामध्ये खालील गटांचा समावेश होतो—

(१) नर्मदा बचाव आंदोलन, चिपको आंदोलन असे पर्यावरण संरक्षण गट

(२) लोकशाही अधिकार संघटना

(३) नागरी स्वातंत्र्य संस्था

(४) गांधी शांती प्रतिष्ठान

(५) महिला अधिकार संस्था

**अव्यवस्थेतून निर्माण झालेले गट**

आमंड आणि पॉवेल असे मत व्यक्त करतात की, 'कमी–अधिक प्रमाणात दंगली, निदर्शने, हत्या यांसारखे समाजातून राजकीय व्यवस्थेत होणारे उद्रेक म्हणजे ॲनॉमिक दबाव गट होत. भारतीय शासन आणि अभिजात

नोकरशाही हे आर्थिक विकास आणि त्यांच्याकडे असलेला संसाधनांचा अभाव या समस्येखाली दबलेले असल्याने, अपरिहार्यपणे तंत्रज्ञशाही आणि राजकारणविरोधी मानसिकतेचे संपादन आणि सर्व प्रकारच्या विवक्षित मागण्या यांमुळे अधिमान्यतेला नकार दिला जातो. परिणामत: हितसंबंधी गट राजकीय व्यवस्थेपासून दूर जातात,'[४] अशा गटांपैकी काही गट पुढीलप्रमाणे—

(१) ऑल इंडिया शीख स्टुडंटस् फेडरेशन
(२) गुजरातची नव निर्माण समिती
(३) नक्षलवादी गट
(४) जम्मू आणि काश्मीर लिबरेशन फ्रंट (जेकेएलएफ)
(५) ऑल आसाम स्टुडंटस् युनियन
(६) युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम
(७) दल खालसा